सुरुवात करा... नव्या समृद्ध जीवनाची
लखपती ठेव योजना
दरमहा रु.२,३५० भरा ३६ महिन्याने रु.१,००,००० मिळवा
इंद्रायणी मुख्य कार्या: भाळवणी बस स्टँड
शाखा: ढवळपुरी,गोरेगाव,सुपा,टाकळी ढोकेश्वर,अ.नगर
अधिक माहितीसाठी संपर्क : 9423059405 9763484973

# पारनेर दर्शन

धरमचंद भवरीलाल
सराफ ॲण्ड ज्वेलर्स
मेन बाजार पेठ (आडत बाजार), बस स्टँड जवळ, नगर अर्बन को-ऑप.बँकशेजारी, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे.
(02138) 22 45 45 w.w.w.facebook.com/dbjweller

वर्ष १ अंक २१५, गुरुवार ९ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# मानवतेची सेवा करणाऱ्या लंके यांना संसदेत पाठवा

■ शरद पवार यांचे आवाहन ■ श्रीगोंदे येथे पवार यांची जाहिर सभा
संजय राऊत, बाळासाहेब थोरात यांची उपस्थिती



श्रीगोंदे : प्रतिनिधी

**कोरोना संकटात संपूर्ण जग भितीच्या छायेखाली असताना आपल्या जीवाची पर्वा न करता तीस हजारांहून अधिक कोरोना रूग्णांच्या माध्यमातून मानवतेची सेवा करणाऱ्या नीलेश लंके यांना संसदेत पाठवा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ श्रीगोंदे येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत पवार हे बोलत होते. माजी मंत्री बाळासाहेब थोरात हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. शिवसेनेचे खासदार संजय राऊत, आ. रोहित पवार, पै. चंद्रहार पाटील, संतोष वेताळ, अंकुश काकडे, मा. आ. राहुल जगताप, राजेंद्र फाळके, जयंत वाघ, बाबासाहेब भोस, घनश्याम शेलार, साजन पाचपुते, अनिल ठवाळ यांच्यासह मोठा जनसमुदाय सभेसाठी उपस्थित होता.

यावेळी बोलताना पवार म्हणाले, कोरोना संकटात सगळ्या जगाला स्वतःच्या जीवाची भिती होती. लोक एकमेकांच्या जवळ जात नव्हते. हॉस्पिटलमध्ये जात नव्हते. आपले उमेदवार नीलेश लंके यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कोरोना रूग्णांची सेवा केली. कोव्हीड सेंटरमध्ये वास्तव्य केले. स्वतच्या घरी गेले नाहीत. कोरोना रूग्णांसोबतच खाणे पिणे केले. एवढी माणूसकी क्वचितच पहायला मिळते. त्या नीलेश लंके यांना या एकाच कामासाठी, त्यांनी मानवतेची सेवा केली म्हणून विजयी करणे तुमचे माझे कर्तव्य आहे. हे काम करून श्रीगोंद्याचा नावलौकीक राज्यात करावे अशी अपेक्षा व्यक्त करतानाच पारनेरसारख्या दुष्काळी तालुक्यातील गरीब कुटूंबातल्या नव्या पिढीतल्या तरूणाला संधी द्या असे आवाहन पवार यांनी केले.

## शेतकऱ्यांचे काय प्रश्न सोडविले ?

मोदींनी शेतीचे काय प्रश्न सोडविले ? कांद्याच्या बाबतीत तर बोलायलाच नको. कांदा जिरायत शेतकऱ्याचे पिक. गरीब शेतक-याला दोन पैसे मिळतात. त्याला आधार देण्याचे काम सरकारचे असते मात्र तसे होत नसल्याबद्दल पवार यांनी खंत व्यक्त केली.

## लंके यांच्यातील शिवसैनिक जागा

नीलेश लंके यांचे भाषण मी ऐकत होतो. त्यांच्यातील शिवसैनिक आजून जागा असल्याचे भाषण ऐकताना जाणवले. शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही तर कालवा फोडेन अशी भाषा शिवसैनिकच करू शकतो. त्यांच्या धमण्यांमध्ये जे भगवे रक्त आहे, जो विचार आहे तो आजही कायम आहे. असाचा माणूस प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी दिल्लीला गेला पाहिजे असे शिवसेना नेते संजय राऊत यांनी सांगितले.

## मोदींना शेतकऱ्यांना पैसे मिळू द्यायचे नाहीत

परदेशात साखरेची गरज आहे. साखर निर्यात केली तर उसाला टनामागे तीनशे रूपये जास्त मिळू शकतील. मात्र साखरेची निर्यात केली जात नाही. साखर, कांदा, दुधाची पावडर निर्यात न करता शेतकऱ्याला दोन पैसे मिळू द्यायचे नाही हे धोरण मोदी यांनी स्विकारले असल्याची टीका पवार यांनी केली.

## त्यांचे आयुष्य ऐशोरामात !

अनेकांना इंग्रजी बोलता येते परंतू खा. डॉ. सुजय विखे यांनी या भागातील एक तरी प्रश्न संसदेत मांडला का ? तोंड उघडले का ? कधीही नाही. यांचे आयुष्य ऐशोआरामात गेले आहे. तिथे आम्ही त्यांना पाहत होतो असे सांगत राऊत यांनी विखे यांना टोला लगावला.

## तुमच्या हाती राज्य कशासाठी द्यायचे?

देशातील १०० पैकी ८७ मुलांना नोकरी मिळत नसल्याचा अहवाल आहे. नोकरी, शेतीमालाच्या भावाचे प्रश्न सुटत नाहीत मग राज्य कशासाठी तुमच्या हातात द्यायचे ? राज्य यांच्या हातात द्यायचे नाही. हा निकाल घ्यावा लागेल असे आवाहन पवार यांनी केले.

## लंकेंच्या रूपाने राष्ट्रवादीचा पहिला खासदार !

सुर्य आग ओकतोय, वातावरण तप्त आहे तरीही उपस्थितांमधून वक्त्यांना बोलण्याचा आग्रह होत आहे. याचा अर्थ येथील जनता जागरूक आहे, सावधपणे मतदान करणारी आहे. ज्यावेळी लंके यांचे नाव जाहिर झाले, त्यानंतर या मतदारसंघाची माहीती घेतली आणि आम्ही जाहिर करून टाकले की राष्ट्रवादी कॉंग्रेसचा एक खासदार दिल्लीला गेला. राज्यात ज्या मोजक्या जागा आहेत तिथे प्रचार करण्याची गरजच नाही. त्यातली ही नीलेश लंके यांची जागा असल्याचे संजय राऊत यांनी ठामपणे सांगितले.

## प्रधानमंत्री नव्हे, प्रचार मंत्री

दहा वर्षात मोदींचे राज्य होते. नगरलाही येऊन गेले. पूर्वी पंतप्रधान महाराष्ट्रात येणार असतील तर आठ दिवसांपूर्वी समजत होते की प्रधानमंत्री येणार आहेत. आता ते महाराष्ट्रात ते मुक्काम करायला लागले तरी प्रधानमंत्री आले की नाही हे कळत नाही. लोक त्यांना बेदखल करण्याच्या विचारात आहेत. गेल्या २० दिवसांत त्यांच्या महाराष्ट्रात २७ सभा झाल्या. मुंबईत १० घेणार असून उर्वरीत महाराष्ट्रात ते १० ते २० सभा घेणार असून ते प्रधानमंत्री नव्हे तर प्रचार मंत्री झाले आहेत. दहा वर्षात उत्तम काम केले असते तर असे वणवण फिरावे लागले नसते असा टोला राऊत यांनी यावेळी लगावला.

## भ्रष्टाचारी म्हणून देशाची बदनामी होईल

देशात नरेंद्र मोदी यांनी ज्याप्रमाणे भ्रष्ट कारभार सुरू केलेला आहे तो पाहता हा देश भ्रष्टाचारी देश म्हणून जगात बदनाम होईल. मोदी, निवडणूक आयोगाने शिवसेना, राष्ट्रवादी हे महाराष्ट्रातील दोन प्रमुख पक्ष महाराष्ट्र लुटण्यासाठी, मुंबई महाराष्ट्रापासून तोडायची आहे यासाठी फोडले आहेत. ही हुकूमशाही आहे. अशी हुकूमशाही सुरू राहिली तर या देशाचे भविष्य अंधकारमय असेल.

## वादळ नव्हे चक्रीवादळ आलंय !

नीलेश लंके हे अत्यंत यशस्वीपणे पुढे नेत आहेत. कुठेही जा त्यांच्या सभांना हजारो लोक उपस्थित असतात. हवा नाही, वादळ नाही तर हे चक्री वादळ असून लंके हे मोठा विजय संपादन करणार आहेत. तरीही शेवटचे मतदान होईपर्यंत प्रत्येकाला काळजी घ्यावी असे आवाहन मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

## शिवसैनिक लंकेंच्या पाठीशी उभे

नीलेश आमचे तालुकाप्रमुख अत्यंत कडवट शिवसैनिक. आज राष्ट्रवादीत असले तरी सर्व कडवट शिवसैनिक त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे राऊत यांनी सांगितले.

## देशात, राज्यात परिवर्तनाची लाट

देशात, राज्यात परिवर्तनाची लाट आलेली आहे. या लाटेचे तडाखे नगर जिल्हयातही बसत आहेत. नीलेश लंके हा आपल्यातला माणूस आहे. आपले प्रश्न मांडण्यासाठी आपला माणूस संसदेमध्ये गेला पाहिजे. ही भूमिका बाळासाहेब ठाकरे यांची होती. शरद पवार व कॉंग्रेसच्या नेतृत्वाची आहे असे राऊत म्हणाले.

## मोदी हरलेले आहेत

या महाराष्ट्रातील प्रत्येक खासदार संसदेत गेला पाहिजे. या निवडणूकीनंतर नरेंद्र मोदी हे विरोधी पक्षात बसलेले दिसतील. कारण मोदी पुन्हा पंतप्रधान होत नाहीत. ते हरलेले आहेत. या निवडणूकीनंतर इंडिया आघाडीचेच सरकार येणार आहे असा विश्वास राऊत यांनी व्यक्त केला.

## विखे यांना कायमचे घरी बसवायचे आहे

तुमचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आतापर्यंत किती पक्ष बदलले ? ते शिवसेनेमध्येही होते. कॉंग्रेसमध्ये होते, त्यांचे चिरंजीव मागील निवडणूकीवेळी राष्ट्रवादीमध्ये जाण्याच्या तयारीत होते. आता त्यांना आपल्याला घरी पाठवायचे आहे. कायमचे घरी बसवायचे असल्याचे राऊत यांनी सांगितले.

# भाव गडगडल्याने कांदा उत्पादकांचा पारनेरात उद्रेक

■ बाजार समितीतील लिलाव बंद पाडले ■ कांदा निर्यातीबाबत केंद्र सरकारच्या धरसोडीचा परिणाम ■ संतप्त शेतकऱ्यांचा मोदी सरकार चलेजावचा नारा ■ पारनेर तहसील कार्यालयात धरणे आंदोलन



पारनेर : प्रतिनिधी

**रविवारी मिळालेल्या भावाच्या तुलनेत कांद्याचे भाव प्रति क्विंटल १ हजार ते बाराशे रुपयांनी गडगडल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवारी पारनेर बाजार समितीतील कांद्याचे लिलाव बंद पाडले.यावेळी शेतकऱ्यांनी मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.मोदी हटाव, शेतकरी बचाव, शेतकरीविरोधी सरकारचा निषेध असो अश्या घोषणा यावेळी बाजार समितीच्या कार्यालयासमोर जमलेल्या शेतकऱ्यांनी दिल्या.**

यावेळी बाजार समितीचे उपसभापती बापूसाहेब शिर्के तेथे उपस्थित होते.त्यांनी शेतकऱ्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.मात्र शेतकरी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.त्यानंतर संतप्त शेतकऱ्यांनी तहसील कार्यालयाकडे मोर्चा वळवला. कांद्याला योग्य भाव मिळावा यासाठी तहसिलदारांच्या दालनासमोर धरणे आंदोलन सुरू केले.

दरम्यान शनिवारी (दि.४ मे ) केंद्र सरकारने कांदा निर्यातीवरील बंदी हटवल्याचे जाहीर केले.त्यानंतर संपूर्ण राज्यात कांद्याच्या भावात वाढ झाली. त्यामुळे उत्पादकांनी मोठ्या प्रमाणावर कांदा आजच्या लिलावात विक्रीसाठी आणला होता.दुपारी १ वाजेपर्यंत बाजार समितीच्या आवारात २५० पेक्षा अधिक गाड्या कांद्याची आवक झाली होती.मात्र केंद्र सरकारने निर्यातशुल्कासह किमान निर्यातदर निश्चित करून निर्यातीस परवानगी दिली असल्याने इतर कांदा निर्यातदार देशांच्या तुलनेत भारतीय कांद्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले. त्यामुळे कांदा निर्यातीवर मर्यादा आल्या.परिणामी दोन दिवसांपूर्वी वाढलेले दर गडगडले.

केंद्र सरकारच्या परकीय व्यापार महासंचालनालयाने (डीजीएफटी) जारी केलेल्या परिपत्रकात निर्यातशुल्काचा उल्लेख नसून, कांद्याचे निर्यातमूल्य ५५० डॉलर प्रतिटन असल्याचे नमूद केले आहे. तत्पूर्वी केंद्रीय उर्वरीत पान ३ वर

## स्पर्धक देशांची खेळी व महाग भारतीय कांदा

भारताने कांद्यावरील निर्यातबंदी उठविल्याचा निर्णय घेताच कांदा निर्यातीत भारताचे स्पर्धक देश असलेल्या पाकिस्तानने त्यांच्या कांद्याचे मूल्य ७०० डॉलरवरून ५०० डॉलर, म्यानमारने ६०० डॉलरवरून ५०० डॉलर तर चीनने ५०० डॉलरवरून ४०० डॉलर प्रतिटन केले आहे. निर्यातमूल्य आणि शुल्क विचारात घेता जागतिक बाजारात भारतीय कांद्याचे दर ८०० डॉलर प्रतिटन राहणार आहे. केंद्र सरकारच्या निर्णयामुळे स्पर्धक देशांच्या तुलनेत भारतीय कांद्याचे दर प्रतिटन ३०० ते ४०० डॉलरने अधिक आहेत. एवढा महाग कांदा कोण खरेदी करणार?

## निर्यातीला परवानगी हा चुनावी जुमला!

कांदा निर्यातीला परवानगी मिळाल्याने भाव वाढतील अशी आशा होती.शेतकऱ्यांना दोन पैसे मिळतील याचाही आनंद होता.मात्र हे समाधान फार काळ टिकले नाही.केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी हटवताना किमान निर्यात मूल्य व निर्यात शुल्क लागू केल्याने निर्यातीवरील खर्च वाढला आहे. त्यामुळे जास्त कांदा निर्यात होण्यास वाव नाही. त्यामुळे ही निर्यात बंदी उठवण्याचा निर्णय पूर्णपणे फसवा आहे ,चुनावी जुमला आहे. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून सरकारने शेतकऱ्यांची चेष्टा केली आहे. सरकारने अटी शर्तीशिवाय कांदा निर्यात पूर्णपणे खुली करावी.

**बाबासाहेब तरटे**
सभापती, पारनेर बाजार समिती.

## केवळ ६० कंटेनर बुक

बंदीनंतर निर्यात खुली होताच ३० टन क्षमतेच्या किमान ३०० ते ४०० कंटेनर कांद्याच्या मागणीची नोंदणी होत असल्याचा आजवरचा अनुभव आहे. यावेळी मुंबई बंदरात केवळ ५० ते ६० कंटेनर बुक झाल्याची माहिती कांदा निर्यातदारांनी दिली. ही अवस्था तुतीकोरीन (तामिळनाडू) बंदराची आहे. केंद्र सरकारने लादलेल्या निर्बंधामुळे निर्यातदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, भारतीय कांद्याचे दर ८०० डॉलर प्रतिटन असल्याने ऑर्डर मिळत नसल्याचे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

## निर्यातशुल्क नेमके किती?

केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या राजपत्रानुसार कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क आहे. परंतु, याबाबत कस्टम विभागाला काहीही सूचना देण्यात न आल्याने ते निर्यातदारांकडून ५० टक्के शुल्क घेत आहेत. याबाबत सरकारकडून सूचना मिळताच १० टक्के शुल्क परत केले जाणार असल्याने कस्टम अधिकाऱ्यांनी निर्यातदारांना सांगितले. निर्यातबंदी उठवून ७३ तासांनंतरही केंद्र सरकारने त्यांच्या सिस्टिममध्ये नवीन अपडेटस् न केल्याने कस्टम विभागही संभ्रमात आहे.

GURUMAULI PODAR LEARN SCHOOL
96 Years of Legacy
2,30,000 Students
ADMISSIONS OPEN 2024-2025
Playgroup to Std. 6
पोदार स्कूलच का...?
LIMITED SEATS AVAILABLE
NO DONATIONS · NO DEPOSITS · NO INTERVIEWS
SCHOOL ADDRESS: Shree Swami Samarthnagar, Jamgaon Road, Parner, Dist. A.Nagar.
9960265965 / 8421996394 / 7758849965

Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's
Saint Vivekanand Public School
A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar
PH-9860815843, 9420812001
REQUIRED TEACHERS 2024-2025
We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address
Note -
• Salary commensurate based on skill, qualification and Experience.
• Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education

महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त यू.डायस कोड-27260709504
संस्कार प्रतिष्ठाण राळेगण सिद्धी संचलित
डी.बी.एम. इंग्लिश मेडीयम स्कूल (State Board)
डी.बी.एम. इंटरनॅशनल स्कूल (CBSE Pattern)
राळेगण सिद्धी,ता.पारनेर,जि.अहमदनगर
2024-25 साठी प्रवेश सुरू
नर्सरी · एल.के.जी. · यू.के.जी. · १ली ते १०वी
गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी समर्पित
7766120168, 9422755191, 7083758198
https://dbmralegansiddhi.blogspot.com

# युवा

## पुरुषांनो वयाला कमी करायचंय?

**महिला असो किंवा पुरुष, काही जणांचे वय त्यांच्या चेहऱ्यावरून लक्षात येते. वाढत्या वयोमानानुसार चेहऱ्यावर सुरकुत्या येणे, डोळ्यांखाली काळी वर्तुळे येणे, मुरुमांचे डाग आदी परिणाम चेहऱ्यावर दिसू लागतात. चेहऱ्याशी संबंधित समस्या उद्‌भवू नये, यासाठी योग्य पद्धतीनं काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांच्या तुलनेत पुरुषांच्या चेहऱ्यावर वाढत्या वयाचे परिणाम लगेच दिसून येतात. त्वचेची योग्य देखभाल न करणे, वाईट सवयी आणि केमिकलयुक्त प्रोडक्टचा भडीमार यामुळे त्वचेवरील नैसर्गिक तेल आणि चमक नाहीशी होऊ लागते. ज्यामुळे कमी वयातच वृद्धत्वाची लक्षणे दिसू लागतात. शिवाय वयाच्या तिशीनंतर शारीरिक प्रक्रियांमध्येही बरेच बदल होतात. ज्यामुळे त्वचेमध्ये नवीन पेशींची निर्मिती होण्याची क्षमता कमी होऊ लागते. परिणामी त्वचेमधील कोलेजन आणि प्रोटीन देखील कमी होते. यामुळे वाढत्या वयासोबत त्वचेवर परिणाम दिसू लागतात. त्वचेशी संबंधित उद्धवणाऱ्या समस्यांमुळे तुम्ही देखील त्रस्त आहात का ? जाणून घेऊया काही सोप्या स्किन केअर टिप्स...**



### रेटिनोइडचा वापर करा

तुम्ही देखील तिशीच्या आसपास पोहोचले आहात, तर रेटिनोइडचा समावेश असलेल्या प्रोडक्टचा वापर करावा. रेटिनोइड हे रेटिनॉल प्रमाणे कार्य करते. रेटिनोइड हे त्वचेमध्ये नवीन कोलेजन उत्तेजित करण्यास मदत करते. यामुळे चेहऱ्यावरील सुरकुत्या आणि डाग दूर होण्यास मदत मिळते.

### कोणते क्लींझर वापरताय ?

काही जण तेलकट त्वचेमुळे त्रस्त असतात. ही समस्या दूर करण्यासाठी केमिकलयुक्त साबण, फेस वॉश तसंच क्लींझरचा वापर केला जातो. पण यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक तेल आणि मॉइश्चराइझरवर दुष्परिणाम होतात. त्वचा रुक्ष आणि कोरडी होऊ लागते. असे झाल्यास त्वचेशी संबंधित गंभीर समस्या उद्‌भवण्याची शक्यता असते. त्वचा कोरडी झाल्यास चेहऱ्यावरील ग्लो कमी होतो. ज्यामुळे तुम्ही म्हातारे दिसू लागता.

### डोळ्यांना लावा क्रीम

डोळ्यांमुळेही आपल्या सौंदर्यामध्ये भर पडते. पण डार्क सर्कलमुळे सौंदर्यामध्ये बाधा निर्माण होते. जर तुमचे वय ३० ते ३५ च्या आसपास असेल तर डोळ्यांच्या आसपास तसंच चेहऱ्यावर सुरकुत्या येणं सामान्य बाब आहे. पण ही समस्या दूर करण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार एखादी क्रीम डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर लावण्यास सुरुवात करा.

### त्वचा ठेवा हायड्रेट

त्वचा हायड्रेट राहण्यासाठी दिवसभरामध्ये भरपूर प्रमाणात पाणी प्या. शरीर डिटॉक्स करण्याची ही नैसर्गिक आणि सोपी प्रक्रिया आहे. पाण्यामुळे चेहऱ्यावर चमक वाढते. पाण्यामुळे त्वचा निरोगी, मऊ आणि चमकदार राहण्यात मदत मिळते. आंघोळ केल्यानंतर त्वचेवर हायड्रेटिंग लोशन देखील लावा.

### चुकीच्या सवयी सोडून द्या

दैनंदिन जीवनातील चुकीच्या सवयींमुळेही आपल्या त्वचेवर वाईट परिणाम होत असतात. उदाहरणार्थ मद्य सेवन, सिगारेट ओढणे इत्यादी वाईट सवयींमुळे आपल्या त्वचेचं भरपूर नुकसान होते. अंमली पदार्थांच्या सेवनामुळे केवळ चेहऱ्यावरच नव्हे तर संपूर्ण शरीरावरही नकारात्मक परिणाम होतात. यामुळे गंभीर आजारांचीही लागण होते.

### पूर्ण झोप घ्या

सुंदर आणि नितळ चेहऱ्यासाठी योग्य प्रमाणात झोप घेणे देखील महत्त्वाचे आहे. नियमित किमान सात ते आठ तासांची झोप घ्यावी. पुरेशा प्रमाणात झोप घेतल्यास आरोग्यावर सकारात्मक परिणाम होतात. शारीरिक तसंच मानसिक आरोग्यही चांगलं राहते. महत्त्वाचे म्हणजे तुमची त्वचा तरुण राहण्यास मदत मिळेल. यामुळेच पूर्ण झोप घेणे आवश्यक आहे.

## चॅटिंग स्टाईलला भुलू नका



**चॅटिंग हा हल्ली अनेकांच्या आवडीचा विषय झाला आहे. एखाद्या व्यक्तीशी आपण जितकं समोरून बोलत नाही. तितकं चॅटिंगमधून बोलतो. मनातील सगळ्या भावना आपण यातून व्यक्त करतो. खासगी विषय, रोमँटीक बोलणे अनेकदा चॅटच्या माध्यमातून होत असते. पण काही व्यक्तींसोबत चॅटिंगमध्येही आपला बाँड जुळत नाही, तर काहींची चॅटिंग स्टाईल ही आपल्याला कायम आकर्षित करून घेतात. पण या चॅटिंग स्टाईलला अजिबात भुलू नका. कारण अशा बोलण्यातून तुम्ही फसवणूक होऊ शकते. ऑनलाईन कोणत्याही नव्या माणसाशी चॅट करताना काही गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात. कारण या गोष्टी लक्षात ठेवल्या तर तुमची कोणाकडूनही फसवणूक होणार नाही.**

### या गोष्टी ठेवा लक्षात

- ऑनलाईनमध्ये किती फ्रॉड होतो हे तुम्हाला सगळ्यांना माहीत आहे. ऑनलाईन जर तुम्हाला चॅटसाठी नवीन रिक्वेस्ट आली असेल. ती रिक्वेस्ट ॲक्सेप्ट करण्याआधी त्या व्यक्तीची प्रोफाईल जाऊन बघा. कारण त्यावरुन अनेक गोष्टी स्पष्ट होतात. जर त्या प्रोफाईलमध्ये काहीच खरे वाटत नसेल तर तुम्ही अशा प्रोफाईलशी फारसा संबंध ठेवणे टाळा.
- एखाद्या व्यक्तीची प्रोफईल योग्य वाटत असेल आणि तुमच्या फ्रेंडसर्कलपैकी कोणतीतरी ओळखीची असेल तरी देखील अशा व्यक्तीशी पटकन बोलायला जाऊ नका. अशा व्यक्तींशी बोलतानाही तुम्ही याची काळजी घ्या.
- काही जणांना उगाचच काहीपण मेसेज पाठवायची सवय असते. काही मेसेज हे टाईप केलेले असतात. अशा मेसेजना मुद्दामून रिप्लाय करायला अजिबात जाऊ नका. उदा. सणांच्या शुभेच्छा... कारण या शुभेच्छा सगळ्यांना पाठवल्या जातात. तुम्ही जर अशांना उगाच मेसेज केला तर कारण नसताना तुम्ही उगाचच संपर्क वाढवत असतात.
- काही जणांना उगाचच गुड मॉर्निंग, ब्युटीफुल असे गोड काही मेसेज करण्याची खूप सवय असते. अशी लोक कोणीतरी मेसेजला रिप्लाय करण्याची वाटच पाहात असतात. अशांना रिप्लाय दिल्यानंतर उगाचच त्या व्यक्ती तुम्हला सतत मेसेज करत राहतात.
- एखाद्या व्यक्तीशी तुम्ही काही दिवसांपासून चॅट करत असाल. ती व्यक्ती तुमच्या कोणत्याही परिचयाची नसताना आणि त्यांच्या फोटोची कोणतीही खात्री नसताना तुम्ही त्यांच्याशी अधिक बोलायला जाऊ नका. एखादे संभाषण सुरू झाले असेल तर खात्री पटल्यानंतर तुम्ही कमी करा.
- काही लोक संभाषणातून तुमच्या सौंदर्याची तारीफ करत असतील, तुमच्यावर प्रेम केल्याचा दावा करत असतील. तर अशा व्यक्तींवर पटकन विश्वास ठेवू नका. काहींचे गोड बोलणे आणि सतत तुमच्या सौंदर्याची तारीफ करणे याकडे लक्ष देऊ नका. अशा व्यक्ती तुम्हाला कमकुवत करण्याचे काम करतात. तुमच्या आयुष्यात जर प्रेमाचा कोपरा हळवा असेल तर तुम्ही या गर्तेत अधिक आत जाऊ शकता. त्यामुळे योग्य पद्धतीने अशा व्यक्तींशी बोला.
- जर तुम्ही एखाद्या प्रसिद्धीच्या क्षेत्राशी निगडीत असाल तर तुम्हाला अशा पद्धतीचे मेसेज आणि चॅटिंग रिक्वेस्ट येणे स्वाभाविक आहे. अशावेळी माहीत नसलेल्या लोकांशी चॅट करू नका.
- पैशांची मागणी करणे आणि लुटणे हा नवा प्रकार सध्या सोशल मीडियावर सुरु आहे. तुम्हाला अनोळखी व्यक्तींशी बोलायचे असेल तरी या ट्रॅपला अजिबात भुलू नका. कारण या लोकांना तुम्हाला लुबाडणे इतकेच माहीत असते. फार मोठी रक्कम नाही पण अगदी १ हजार रुपयांपासून याची सुरुवात होते.
- जर तुम्ही ऑनलाइन डेटिंगवर विश्वास ठेवत असाल तर चॅट करा, पण असे करताना लगेचच एखाद्या व्यक्तीला भेटायला मुळीच जाऊ नका. कारण एखाद्या अनोळख्या व्यक्तीला भेटणे हे तसे धोक्याचे असते. जोपर्यंत तुम्हाला पूर्ण विश्वास होत नाही तोपर्यंत मुळीच भेटू नका. ऑनलाइन ओळखीवरून अनेकांची लग्न झालेली आहेत. पण त्यासाठी तुम्हाला सगळ्या गोष्टींची योग्य माहिती घेणे गरजेचे असते.
- ऑनलाईन चॅटिंग करताना एखादी व्यक्ती जर तुम्हाला फार खासगी आणि सेक्शुअली बोलत असेल आणि त्याचे बोलणे तुम्हाला खटकत असेल तर तुम्ही मुळीच चॅट वाढवू नका. त्या व्यक्तीला तुम्ही तिथेच ब्लॉक करा आणि याची माहिती इतरांनाही द्या.कारण आता चॅटिंग करताना या गोष्टी तुम्ही कायम लक्षात ठेवा.

### ऑनलाइन नाते जुळवताना...

**ऑनलाईन डेटिंग ॲप्लिकेशनद्वारे अनेक अपराध होताना दिसतात. हल्ली तर हे प्रमाण जास्त वाढलं आहे. अनेक तरुण आणि तरुणी याचा फायदा घेताना दिसतात. पण यामुळे काही जण बदला घेण्यासाठीही त्याचा उपयोग करून घेतात. ब्लॅकमेल करणे, फोटो सेव्ह करणे आणि अन्य गोष्टींचा यासाठी उपयोग करण्यात येतो.**



#### ✓ खरे कसे ओळखावे ?

समोरच्या व्यक्तीचा फोटो मागा. त्याच्याविषयी तुम्ही इंटरनेटवर अधिक माहिती गोळा करण्याचा प्रयत्न करा. तसंच त्याच्या कुटुंबाचे प्रोफाईलही तपासा. त्यांचे फोटो आणि इतर त्याने सांगितलेली माहिती बरोबर आहे का ते तपासून घ्या. हे सर्व तुम्ही योग्य तऱ्हेने तपासले तरच तुम्हाला समोरचा व्यक्ती खरे बोलत आहे की नाही याची माहिती कळू शकते. समोरचा व्यक्ती जर आपल्या नातेवाईकांबद्दल खोटे सांगत असेल तर तुम्हाला पटकन कळू शकते.

#### ✓ सावधान राहण्यासाठी...

प्रोफाईल हाईड हा पर्याय निवडा आणि जास्त फोटो अपलोड करू नका. कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी जास्त जवळीक साधू नका. चर्चा करू नका. जितकी माहिती देणं गरेजचं वाटतं तितकीच द्या. ऑनलाईट डेटिंग ॲप्लिकेशनवर आपली वैयक्तिक माहिती जास्त देऊ नका. ऑनलाईन डेटिंग ॲप डाऊनलोड करताना तुमचा फोन जर कोणती परवानगी मागत असेल तर विचारपूर्वक तसे करा. बरेचदा फोन गॅलरी, कॅमेरा, माईक, रेकॉर्डर अन्य फिचरची परवानगी ॲप्लिकेशन वापरताना मागितली जाते. यामुळे हॅक होण्याची शक्यता असते. त्यामुळे काळजी घेऊन मगच माहिती अपलोड करा.


## नात्यात फसवणूक ओळखायची?

**भारतात लग्न हे एक अतिशय पवित्र नाते आहे. लग्नात आयुष्यभरासाठी एकमेकांसोबत अतूट नात्यात राहणं हे महत्त्वाचं असते. पण लव्ह मॅरेज असो की अरेंज्ड मॅरेज, कोणीही आपला पार्टनर इतर कोणाशीही शेअर करू शकत नाही. लग्न केल्यानंतर आपल्या जोडीदारासोबत प्रामाणिक राहणे ही गोष्टी महत्त्वाची असते. पण आजकालच्या काळात नात्यांमध्ये फसवणूक होण्याची समस्या खूपच वाढली आहे. यामुळे नात्यात दुरावा निर्माण होतो. तुमच्या पतीचे विवाहबाह्य संबंध तर चालत नाहीत ना हे तुम्हालाही जाणून घ्यायचे असेल तर या लक्षणांवरून ओळखा...**

- स्वतःकडे जास्त लक्ष देणे : जेव्हा एखादा माणूस प्रेमात असतो किंवा एखाद्यासोबतच्या नात्याच्या सुरुवातीला तो स्वतःकडे खूप लक्ष देतो. त्याचे व्यक्तिमत्व आकर्षक बनवण्याचा प्रयत्न करतो. जर तुमचा नवरा देखील असे करत असेल तर हे लक्षण असू शकते की कोणीतरी त्याच्या आयुष्यात प्रवेश केला आहे. पण या गोष्टीची आधी खात्री करा, मगच पतीला विचारा.
- तुलना इतरांशी करणे : जर तुमचा नवरा तुमची तुलना इतर कोणत्याही महिलेशी करत असेल तर समजा की त्याला आता तुमच्यात कमतरता दिसू लागल्या आहेत. अनेक वेळा असे घडते कारण तुमचा नवरा तुमच्यामध्ये दुसऱ्या स्त्रीचा चांगुलपणा शोधत असतो. अशावेळी तुमच्यातील त्यांचा रस कमी झाला आहे ही गोष्टी स्पष्ट होते.
- फोनवर चिकटून राहणे : जर तुमचा पती फोनवर बराच वेळ चिकटून असेल. त्याचा फोन नेहमी त्याच्याजवळ ठेवत असेल. तर समजून घ्या की कुठेतरी काहीतरी गडबड आहे. त्याच्या मनामध्ये तुम्ही त्यांचा फोन चेक कराल ही भीती असते.



- बॉडी लँग्वेजमध्ये बदल : जर तुमच्या पतीचे हावभाव बदलत असतील तर ते दुसऱ्या महिलेमुळे असू शकते. अशा स्थितीत लोक ऑफिसमध्ये जास्त काम असल्याची सबब पुढे करतात. बाहेर जास्त वेळ घालवायला सुरुवात करतात. अशावेळी ते तुमच्यासोबत वेळ घालवणे टाळतात, मग समजून घ्या की काहीतरी गडबड आहे.
- जवळीक नसणे : वैवाहिक नात्यात शारीरिक जवळीक सर्वात महत्त्वाची असते. तुमच्या नात्यात ते बिघडत असेल तर काळजी घ्या. जर तुमच्या पतीला तुमचा स्पर्श आवडत नसेल किंवा तुमच्याबद्दल भावना नसतील तर ते तुमच्यासाठी एक मोठे लक्षण असू शकते. अनेकवेळा या गोष्टी बाहेर सापडल्या की बायकोसोबत या गोष्टी कमी होतात. जर तुमच्या बाबतीतही ही गोष्ट होत असेल तर सावध होणे गरजेचे आहे.



## अशा तरुणींसोबत लग्नाची नसते कुणाची इच्छा!

**प्रत्येक व्यक्तीला कोणत्या- न्- कोणत्या गोष्टींचा राग येतोच, कारण त्या गोष्टी ती अथवा तो अजिबात सहन करू शकत नाहीत. महिला व पुरुषांबाबत सांगायचे झाले तर, काही महिला विशिष्ट प्रकारच्या पुरुषांपासून दूर राहणेच पसंत करतात, तर पुरुषही विशिष्ट प्रकारच्या महिलांपासून स्वतःला दूर ठेवतात. पुरुषांना महिलांच्या काही सवयी अजिबात आवडत नाहीत, ज्यापासून ते अनेकदा दूर राहण्याचा पर्याय निवडतात. अशा महिला जोडीदार झाल्यानंतर त्यांच्या सवयी लक्षात आल्यास नात्यात दुरावा निर्माण होण्यास वेळ लागत नाही. तुमच्यातही अशा सवयी असतील तर त्या सुधारण्याची गरज आहे, अन्यथा लग्नाच्या बाबतीत तुम्हाला पश्चाताप करावा लागू शकतो. चला जाणून घेऊया सविस्तर...**



- दुर्लक्ष करण्याची सवय : काही तरुणींना सतत आपल्या बॉयफ्रेंडच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करण्याची सवय असते. जोडीदाराने आपल्या मागे- मागे करावे, याकरीता काही महिला त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. पण अशा महिलांची ही सवय त्यांच्यावर भारी पडू शकते. पुरुष अशा महिलांपासून दूर पळू लागतात. जर तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत असेच वागत असाल तर लवकरच ते तुमच्यापासून दूर होण्याची शक्यता आहे. जर तुम्ही तुमच्या प्रियकराला किंवा कोणत्याही मुलाला तुमच्या इशाऱ्यावर नाचवण्याचा विचार करत असाल तर काही काळानंतर ते स्वतःला या नात्यातून मुक्त करण्याचे ठरवतील.
- हुकूम गाजवणाऱ्या महिला : पुरुषांना हुकूम गाजवणाऱ्या स्वभावाच्या महिला आवडत नाहीत. तसेही पुरुषांमध्ये अहंकार जरा जास्तच असतो आणि तो पटकन दुखावलाही जातो. अहंकार ही चांगली गोष्ट नाही, परंतु जेव्हा तुम्ही त्यांना हुकूम देण्यास सुरुवात करता तेव्हा त्यांचा स्वाभिमानही दुखावतो. जर तुमचा स्वभाव असा असेल तर तुम्हाला तो बदलायला हवा नाहीतर तुमचा बॉयफ्रेंड लग्नाचा विचार करू शकणार नाही.
- छोट्या छोट्या गोष्टींचा हेवा वाटणे : रिलेशनशिपमध्ये थोडासाही मत्सर-द्वेष योग्य मानला जात नाही. पण या सवयीने मर्यादा ओलांडली तर पुरुष अशा महिलांपासून दूर पळतात. आवश्यकतेपेक्षा अधिक हेवा वाटणे, ही गोष्ट महिलांना आवडत नाही.

### सवयी सुधारणे

पुरुषमंडळी आपल्या जोडीदारामध्ये स्वतःच्या आईची छवी नक्कीच पाहत असतात. पण आपण त्याच्या सवयी सुधारण्याकरीता मर्यादेपेक्षा अधिक त्यांच्या मागे लागता तेव्हा त्याची चिडचिड होऊ लागते. आपण त्याची काळजी घ्यावी, अशी त्याची इच्छा असते. परंतु प्रत्येक छोट्या गोष्टीत व्यत्यय आणणे त्याला आवडत नाही. प्रत्येक गोष्टीवर कटकट करणाऱ्या मुलींपासून मुलांना दूर राहायला आवडते.

त्यामुळे तुमची ही सवय पुरुष सहन करतील अशी अपेक्षा करणे योग्य ठरणार नाही. सतर्क राहणे महत्त्वाचे आहे, पण तितकेच आपल्या जोडीदारावर विश्वास ठेवणेही महत्त्वाचे आहे.

- खासगी वेळेत लुडबुड करणं : आपण सतत आपल्या जोडीदाराबरोबर राहावे, अशी इच्छा एखाद्या महिलेनं बॉयफ्रेंडजवळ व्यक्त केली तर सुरुवातीला त्याला चांगलं वाटेल. पण कालांतरानं याचा त्याला कंटाळा येऊ शकतो. आपल्या खासगी वेळेत कोणीही लुडबुड करू नये, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते. वारंवार फोन- मेसेज करून बॉयफ्रेंडच्या खासगी आयुष्यात हस्तक्षेप करत असाल तर त्याला ते मुळीच आवडणार नाही. यामुळे तुमच्या नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो.



## शॉर्ट न्यूज

### लहुजी क्रांती सेनेचा लंके यांना पाठिंबा

■ **नगर :** सत्यशोधक लहुजी क्रांती सेना या राज्यव्यापी सामाजिक संघटनेने राज्यामध्ये महाविकास आघाडी सर्व घटक पक्षांबरोबर लोकसभा निवडणूक २०२४ साठी एक सामाजिक संघटना म्हणून काम करण्याचा निर्णय राज्यातील संघटनेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी घेऊन महाविकास आघाडी बरोबर काम करण्याची ठरविले. त्यामुळे नगर दक्षिणचे महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांना संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली मीलेश लंके यांना एका सभेदरम्यान सत्यशोधक लहुजी क्रांती सेना या संघटनेने जाहीर पाठिंबा दिला.

### पुरोहित प्रतिष्ठानचे कार्य धर्मासाठी: मालपाणी

■ **संगमनेर :** पुरोहित प्रतिष्ठानचे कार्य देव, देश आणि धर्मासाठी समर्पित असल्याने या कार्याचे मोल करता येणे शक्य नाही. प्रत्येक संगमनेरकराची छाती अभिमानाने फुलून यावी असे हे अनमोल कार्य आहे. पुरोहित प्रतिष्ठानच्या माध्यमातून संगमनेर मध्ये संस्कारांची गंगा प्रवाहित झालेली आहे, असे गौरवोद्गार उद्योजक गिरिश मालपाणी यांनी काढले. संगमनेर येथे प्रतिष्ठानच्यावतीने व्रतबंध सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यात अर्णव भोंग, अनुप देशमुख सह सत बंधूंना वेदमंत्रांच्या घोषात मौंजीबंधनाचे उपनयन संस्कार विधीवत देण्यात आले.

### बसपाच्या उमेदवाराची नारळ वाढून प्रचार फेरी

■ **नेवासा :** शिर्डी लोकसभा मतदारसंघातील बहुजन समाज पार्टीचे अधिकृत उमेदवार रामचंद्र जाधव यांच्या प्रचारार्थ मंगळवारी नेवासा शहरातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर व खोलेश्वर गणपती मंदिर येथे प्रचाराचा नारळ वाढवून प्रचाराची सुरुवात करण्यात आली. नेवासा शहर व तालुक्यातील विविध ठिकाणी प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी नागरिका मधुन चांगला प्रतिसाद मिळाला. नेवासा तालुक्यातील बहुजन समाज पार्टीचे उमेदवार तसेच महिला पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मोदींना मत म्हणजे विकासाला मत- लोखंडे

■ **वरखेड :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मत आणि मोदींना मत म्हणजे विकासाला मत, असे मत शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना उमेदवार खासदार सदाशिव लोखंडे यांनी केले. वरखेड येथे भाजप-सेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. लोखंडे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या समर्थ नेतृत्वात तिसऱ्यांदा महाविजय साकार करून विकसित भारताच्या दिशेने मार्गस्थ होण्यासाठी महायुतीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे. पंतप्रधान मोदी यांचे हात बळकट करण्यासाठी प्रयत्न करावा.

### बांधकामावरून मारहाणीत महिला जखमी

■ **सोनई :** बाथरुमचे बांधकाम करण्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत महिला जखमी झाल्याची घटना नेवासा तालुक्यातील बेल्हेकरवाडी येथे घडली. सोनई पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून ६ रोजी बेल्हेकरवाडी येथे फिर्यादी महिलेचे बाथरुमचे काम चालू होते. त्याठिकाणी आरोपी बाबासाहेब शंकर बेल्हेकर, हरिभाऊ शंकर बेल्हेकर दोघे रा. बेल्हेकरवाडी यांनी फिर्यादी महिलेस त्या ठिकाणी येऊन या बांधकामावरुन कोयत्याने मारहाण करत जखमी केले. फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

# खा. सुजय विखेंच्या माध्यमातून नगर जिल्हा प्रगत होईल

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांचा विश्वास



**शेवगाव : प्रतिनिधी**

**उभा देश म्हणतोय की देशाला मोदींशिवाय पर्याय नाही. खा. डॉ. सुजय विखे यांच्या माध्यमातून नगर जिल्हा हा देशातील पहिल्या १० प्रगत जिल्ह्यात आल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. ते शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील महायुतीच्या प्रचार सभेत बोलत होते.**

अहिल्यानगर दक्षिण लोकसभा निवडणुकीतील महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथे महासभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यासह आमदार मोनिकाताई राजळे, चंद्रशेखर घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब नाहटा, दत्ताभाऊ पानसरे, नंदू मुंडे, अरूण मुंडे, एकनाथ खटाळ, काकासाहेब ननावरे, राहुल देशमुख आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सभेला मार्गदर्शन करताना मंत्री मुंडे म्हणाले की, मोदी साहेब देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान होताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणाऱ्या उमेदवाराच्या प्रचारासाठी आल्याचा आनंद होत आहे.

२०१४ मध्ये देश दिवाळखोरीत निघाला असताना नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधान पदाची धुरा सांभाळत १० वर्षात इतके काम केले की, देशाची अर्थव्यवस्था ५ व्या क्रमांकावर आणुन ठेवली आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगात देशाची इतकी पत आणि प्रतिष्ठा वाढली आहे की, आपल्या देशाबद्दल जर इतर देशातील मंत्रीमडळातील एखाद्या नेत्याने ब्र जरी काढला तरी त्या देशाचा पंतप्रधान त्या नेत्याचा राजीनामा घेतो. आज ही ताकद पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आहे. यामुळे जर देश सुरक्षित आणि विकसित ठेवायचा असेल तर मोदींशिवाय देशाला कोणताही पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी त्यांनी विरोधकांचा सुद्धा चांगलाच समाचार घेतला. त्यांनी सांगितले की, ७० वर्षात ज्यांनी सत्ता भोगली त्यांनी केवळ लोकांची फसवणूक केली. तर पंतप्रधान मोदी यांनी ८० टक्के लोकांना मोफत राशन देवून त्यांची भूक भागवली आहे.

# पक्षाने घेतलेली वेगळी भूमिका मी का स्विकारावी?

## ■ विजय औटी यांचा सवाल ■ पारनेर येथे कार्यकर्ता मेळावा



■ लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

**पारनेर : प्रतिनिधी**

**पदावर काम करताना काही योजना समजावून घ्याव्या लागतात, सुजय विखे यांचा पाच वर्षांचा अनुभव लक्षात घेता त्यांनी चांगले काम केले. त्यांना पुन्हा संधी दिली तर मतदारसंघात त्याचा फायदा होईल. अशा स्थितीत पक्षाने वेगळी भूमिका घेतली ती मी का स्विकारावी असा सवाल विधानसभेचे माजी उपाध्यक्ष विजय औटी यांनी केला.**

विजय औटी यांनी डॉ सुजय विखे यांना पाठींबा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मात्र महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांना साथ देण्याचा निर्णय घेतला, या पार्श्वभुमीवर पारनेर येथे बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात औटी हे बोलत होते.

औटी म्हणाले, माझी भूमिका लोकाभिमुख आहे. या निवडणूकीत देशाच्या लोकशाहीवर बोलणारा उमेदवार हवा. मी राजकारण करताना लोकांना, लोकांचे प्रश्न समोर ठेऊन केले. या निवडणूकीत माझी जनता कोणाच्या हाती सुरक्षित आहे हे मी पाहिले. निर्णय घेताना पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. या मेळाव्यासाठी कोणालाही फोन केले नाहीत. सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाहन केले आणि कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित राहिल्याचे औटी यांनी सांगितले.

औटी म्हणाले, देश कुणाच्या हाती सुरक्षित राहणार आहे हे मी पाहिले. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा या पदावर विराजमान होणार आहेत.
शेतीच्या बाजारभावात चढउतार होतात. याच बाजारभावामुळे काहींचे बंगले उभे राहिले हे विसरले का ? शरद पवार हे देशाचे कृषी मंत्री होते, त्यावेळी त्यांनी हमीभावाचा कायदा का केला नाही ? कांद्याबाबत ठोस धोरण घेणे गरजेचे असल्याचे औटी म्हणाले.
एखाद्या वर्षी एखाद्या पिकाचे मोठया प्रमाणावर उत्पादन झाले. देशाच्या इतर भागात दुष्काळी स्थिती निर्माण झाली. ते पिक प्रचंड पैसा देऊन गेले. लोकांचे चांगली घरे बांधली गेली. मात्र प्रत्येक वेळी असाच भाव मिळावा असे प्रत्येकाला वाटू लागले हे भांडवली अर्थशास्त्र आहे. मागणी आणि उत्पन्न यांचा अवमेळ होतो तेंव्हा भाव कोसळतात.

रामदास भोसले, राहुल शिंदे, सुरेश बोऱ्हुडे, विजय सदाशिव औटी, युवराज पठारे,शंकर नगरे, गणेश शेळके, नीलेश खोडदे यांच्यासह औटी समर्थक यावेळी उपस्थित होते.

# वंचितच्या उमेदवार उत्कर्षा रुपवतेंवरहल्ला

## अज्ञाताकडून वाहनावर दगडफेक

**संगमनेर : प्रतिनिधी**

**शिर्डी लोकसभेच्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवार उत्कर्षा रुपवते यांच्या वाहनावर अज्ञाताकडून दगडफेक करत हल्ला करण्यात आल्याची घटना घडली.उत्कर्षा रुपवते आपले कार्यकर्ते व सहकाऱ्यांसमवेत नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील प्रचार दौरा आटपून परत येत होत्या. अकोले येथून संगमनेरकडे**



**येत असताना काही अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या चारचाकी वाहनावर दगडफेक करत हल्ला केला.**

हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झालेत. उत्कर्ष रुपवते यांच्या वाहनावर झालेले हल्ल्याचा ठिकठिकाणी निषेध व्यक्त केला जात आहे.

अकोले पोलिसांकडून सदर घटनेचा तपास केला जात आहे. पोलीस देखील घटनास्थळावर दाखल झाले होते. मात्र, हा हल्ला कोणत्या कारणातून झाला, याची अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही.

(पान १ वरून)

### भाव गडगडल्याने कांदा उत्पादकांचा पारनेरात उद्रेक

अर्थमंत्रालयाने शुक्रवारी (दि. ३) राजपत्र जारी करीत त्यात कांद्यावर ४० टक्के निर्यातशुल्क असल्याचे नमूद केले आहे.या दोन्ही बाबींमुळे कांद्याचे निर्यातमूल्य ६७ रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहे. इतर कांदा निर्यातदार देशांनी कांद्याचे दर कमी केल्याने महागात पडणारा भारतीय कांदा कोण खरेदी करणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

डीजीएफटीच्या परिपत्रकात केवळ निर्यातमूल्यांचा उल्लेख असणे आणि अर्थमंत्रालयाच्या राजपत्रात कांद्यावरील ४० टक्के निर्यातशुल्क कायम असल्याचे नमूद करणे हा घोळ कांदा निर्यातीच्या इतिहासात पहिल्यांदाच झाला आहे. त्यामुळे कांद्याचे निर्यातमूल्य ८०० डॉलरवरून ५५० डॉलर प्रतिटन केल्याचे शेतकऱ्यांना सांगितले जात असून, निर्यातशुल्क कायम असल्याचे कुणीही उघड करीत नाही. या दोन्ही बाबी विचारात घेता निर्यातदार ६७ रुपये प्रतिकिलोपेक्षा कमी दरात कांदा विकू शकत नाही.









# तीस वर्षानंतर भरले अळकुटीचे बाजारतळ !

## ■ नीलेश लंके यांच्या सभेला प्रचंड प्रतिसाद ■ लंके यांच्या सभेसाठी राष्ट्रवादी, शिवसेनेचे कार्यकर्ते एकवटले

अळकुटी : स्वप्निल भालेराव

**राजकीयदृष्टया संवेदनशिल असलेल्या अळकुटी गावामध्ये झालेल्या आ. नीलेश लंके यांच्या प्रचारसभेसाठी मंगळवारी अळकुटीचे बाजारतळ तब्बल तीस वर्षानंतर खचाखच भरले होते. यापूर्वी शिवसेना शाखा स्थापनेसाठी दादा कोंडके यांच्या सभेसाठी हे बाजारतळ खचाखच भरले हाते.**

यावेळी बोलताना आ. लंके म्हणाले, मी सरपंचपदापासून काम करण्यास सुरूवात केली, प्रत्येक पदाला न्याय दिला. मी प्रत्येकाचा फोन घेतला म्हणूनच आज खासदारकीचा उमेदवार आहे. विखेंची यंत्रणा बिंत्रणा काही नाही, घोगरे ताईचा पाहुणा घरी पाठविला नाही तर नाव बदलेल. घोगरे ताईनी त्यांची आरती करण्याची तयारी ठेवावी असे ते म्हणाले.

वीस बावीस वर्षापूर्वी तालुक्याला गुलाबराव शेळके यांच्या रूपाने संधी होती मात्र यश आले नाही. आता पुन्हा ही संधी आली असून आपल्याला या संधीचे सोने करायचे आहे. आता नाही तर कधीही अशी संधी येणार नाही. बाहेर असे चित्र रंगविले जाते की पारनेरमध्ये काही खरे नाही. हा स्वाभीमानी तालुका आहे. सेनापती बापट, अण्णा हजारे यांचा तालुका आहे. हा विकला जाणारा तालुका नाही. तालुक्यात राष्ट्रवादी व शिवसेना या दोनच राजकीय शक्ती आहेत. दोन पक्ष ऐकवटलेले असताना किमान एक लाख मताधिक्य मिळणार असल्याचा आत्मविश्वास लंके यांनी व्यक्त केला.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी डॉ. भास्कर शिरोळे, डॉ.श्रीकांत पठारे, संजय मते, महेश शिरोळे, सचिन साखला, संतोष काटे, हनुमंत भोसले, संतोष नरसाळे, किरण पानमंद, श्रीकांत डेरे, संतोष येवले, गंगाधर शेळके, लक्ष्मण म्हस्के, तात्याभाऊ मेहेर, संतोष खाडे, कांचनताई दत्तात्रेय म्हस्के, संजय भालेराव, किरण दरेकर, डॉ. प्रवीण भालेराव यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.



■ नीलेश लंके यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेसाठी अळकुटीचे बाजारतळ ३० वर्षानंतर प्रथमच खचाखच भरले होते.

### इंग्लिश बोलता की इंग्लिश पिऊन बोलता ?

**इंग्लिश आम्हालाही बोलता येते, आम्हालाही जमते परंतू परिस्थिती अशी आहे, मराठी बोलून कोणी झिरो होत नाही आणि इंग्लिश बोलून कोणी हिरो होत नाही. ज्याला लोकांच्या भावना, वेदना, कळतात, दुःख कळते, अडचणीच्या काळात जो समाजासोबत उभा असतो तो खरा हिरो असतो. नगर जिल्हयात एकच हिरो आहे तो म्हणजे आ. नीलेश लंके. तुमचे खासदार मोठे अवघड आहेत, कांद्याचे भाव ठरविण्याचा अधिकार केंद्र सरकारकडे नाही तर ते निसर्गावर अवलंबून आहे. आहो खासदार तुम्ही इंग्लिशच बोलता की इंग्लिश पिउन बोलता ?**

यशवंत गोसावी, स्टार प्रचारक

### तालुक्यात मोठे लीड घेणार

**जो उमेदवार, पक्ष आपल्या रोजच्या गरजेला धावून येईल त्या पक्षाला, उमेदवाराला आपण मत दिले पाहिजे. समोरचा उमेदवार गरजेला धावून जाईल असा नाही. राष्ट्रवादी व शिवसेना या निवडणूकीत एकत्र असून नीलेश लंके हे पारनेर तालुक्यात मोठे लीड घेणार आहे.**

डॉ. श्रीकांत पठारे, तालुकाप्रमुख

### कोरोना काळातील कोरोना कामाची लाट

**नीलेश लंके यांच्या कोरोना कामाची लाट आज आलेली आहे. या देशात, जगात कोरोना काळात उध्दव ठाकरे, नीलेश लंके यांनी मोठे काम केले आहे. त्यामुळे लंके यांच्यासह महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा विजय निश्चित आहे.**

संजय मते, युवा नेते

# कुकडीच्या आवर्तनाची पारनेरकरांना प्रतीक्षा

## ■ पिण्याच्या पाण्याचे हक्काचे आवर्तन कधी? ■ येत्या १० तारखेपर्यंत पाणी न सुटल्यास शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात व सर्वत्रच सध्या सूर्य अक्षरशः आग ओकत असून उन्हाळ्याच्या तडाख्याने तीव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे. विहिरीनी तळ गाठल्याने जनावरांना पिण्याच्या पाण्याचा तुटवडा जाणवू लागला आहे चारा पिके ही जळून जाऊ लागली आहेत.त्यामुळे पारनेरकरांना कुकडीच्या आवर्तनाची आस लागून राहिली आहे.**

गेल्या पंधरा दिवसापासून कुकडी पट्ट्यात नागरिकांना तीव्र पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. उन्हाचा तडाखा इतका वाढला आहे की चाऱ्या ऐवजी रणरणत्या उन्हात जनावरे पाणीच जास्त मागू लागली आहे. त्यामुळे शेतकऱ्यावर पाणी टंचाईचे मोठे संकट उभे राहिले असून येत्या दहा तारखे पर्यंत पाणी न सोडल्यास शेतकऱ्यांनी जनावरांसह आंदोलन करण्याच्या तयारीत असल्याचा इशारा जनतेतून देण्यात आला आहे.

माजी चेअरमन प्रदीप सोमवंशी, संतोष पठारे ,पारनेर बाजार समिती संचालक संदीप सालके ग्रा.सदस्य कानिफनाथ पठारे. पंढरीनाथ कवास्टे, संतोष सालके, माजी सरपंच सुभाष आढाव यांनी दिला आहे.

पाण्यासाठी पारनेरकर नेहमीच अकार्यक्षम आहेत अनेक वर्षांपासून अनेकांनी बोलघेवडे राजकारण केले पण पाणी मात्र पारनेरकरांना



वेळेत कुणीच पाजू शकले नाहीत सर्वसामान्य नेहमीच आंदोलने इशारे रस्ता रोको आदी करूनच कुंभकर्णी प्रशासनाला जागे करावे लागले तेव्हा कुठे पाणी मिळायचे. कालवा असूनही हक्काचे पाणी मिळविता येत नसेल तर पारनेरकरांचे यापेक्षा दुर्दैव कोणते सर्वपक्षीय नेत्यांचे लोकांच्या प्रश्नकडे सोयीस्कर दुर्लक्ष याला कारणीभूत ठरत असावे किंवा पुणेकर नगरकरांना वरचढ म्हणावे लागतील कारण ते न चुकता पाण्यापासून वंचित ठेवण्यासाठी तर सतत आटोकाट प्रयत्न करताना नेहमी दिसतात हा त्यांचा कदाचित आवडता छंद झाला असावा असे दिसते. तालुक्यात सर्व राजकारण्यांची सारखीच परिस्थिती झाली असून हक्काच्या पाण्यासाठी कुणीच पुढाकार घेत नाहीत समन्वयी पाणी वाटपाचा ही विसर त्यांना पटकन पडतो या बाबत शेतकऱ्या मध्ये मात्र नाराजीचा सुर आहे. तहानलेल्या जनतेला जास्त वेठीस न धरता येत्या दहा तारखेपर्यंत कुकडी कालव्यातुनपाणी सोडावे अशी मागणी होत आहे.

# काकासाहेब यांचे कार्य दीपस्तंभासारखे!

## ■ हभप डॉ. नारायण महाराज जाधव यांचे गौरोद्गार ■ डॉ. हबीब शेख यांना आरोग्यभूषण पुरस्कार



नगर : प्रतिनिधी

**माजी आमदार कि.बा. उर्फ काकासाहेब म्हस्के यांनी नगरच्या समाजकारण, शिक्षण, आरोग्य सेवांसह जिल्ह्याच्या कृषी, पाणी प्रश्नांसाठी महत्त्वपूर्ण असे योगदान दिलेले आहे. नगर तालुक्यातील दुष्काळ हटविण्यासाठी पाझर तलावांचे त्यांनी उभारलेले विक्रमी जाळे आणि रोजगार हमी योजनेतून केलेली कामे आजही आदर्शवत अशी आहेत. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले डॉक्टर व्हावी यासाठी त्यांनी पाहिलेले स्वप्न आणि म्हस्के परिवाराने या स्वप्नपूर्तीसाठी केलेले प्रयत्न आणि पराकाष्ठा कौतुकास पात्र असून काकासाहेब म्हस्के यांचे कार्य दीपस्तंभासारखे असल्याचे प्रतिपादन आळंदी येथील हभप डॉ.नारायण महाराज जाधव यांनी केले.**

कै.काकासाहेब म्हस्के यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त काकासाहेब म्हस्के मेमोरिअल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने स्मृती पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी हभप जाधव अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

याप्रसंगी काकासाहेब म्हस्के यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दुर्गम व आदिवासी वाडीवस्त्यांवर आरोग्य सेवा देणारे डॉ.हबीब शेख यांचा आरोग्यभूषण, ग्रामीण भागात शिक्षणाची सेवा देणारे साहेबराव घाडगे पाटील यांचा शिक्षणभूषण, लोककलावंत माजी नगरसेवक भाऊसाहेब उडानशिवे यांचा समाजभूषण, जेष्ठ पत्रकार मोहिनीराज लहाडे यांचा वृत्तभूषण, साहित्यिक गीताराम नरवडे यांचा साहित्यभूषण पुरस्काराने तर जेष्ठ कृषि आणि जलसंधारण तज्ञ कै.भास्करराव म्हस्के कृषिमित्र पुरस्काराने कृषी क्षेत्रात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल माजी जिल्हा परिषद सदस्य ॲड.सचिन अरुण जगताप यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुभाष म्हस्के, विश्वस्त डॉ.सुमती म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ.दीप्ती ठाकरे, संस्थेचे सीईओ आर्कि.समीर ठाकरे, मेजर आलम शेख, मुनवर शेख, आमीन शेख, अस्लम शेख, तारकराम झावरे, डॉ. विलास जाधव, प्राचार्या डॉ.अनुराधा पाटणकर, प्राचार्य नितीन ढुबे, प्राचार्य अजित चवरदार आदी उपस्थित होते.

### गरिबांचा डॉक्टर मामा

**पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे दरवेशी या अस्वलाचा खेळ करणाऱ्या भटक्या समाजात जन्मलेल्या डॉ. हबीब शेख हे अकोले तालुक्यातील ब्राम्हणवाडा परिसरातील दुर्गम व आदिवासी वाडीवस्त्यांवर गेली चाळीस वर्षाहून अधिक काळ आरोग्यसेवा देत आहे. आजच्या वैद्यकीय स्पर्धे च्या युगातही केवळ पन्नास रूपयात रूग्णाला इंजेक्शन व औषधे ते देतात. रुग्णाकडे पैसे नसतील तर तपासणी शुल्क तर ते घेत नाहीत उलट त्या रूग्णाला घरी जाण्यासाठी स्वत:च्या खिशातून खर्चीला पैसे देतात. त्यामुळेच आज या परिसरात लहानांपासून वृध्दांपर्यंत सर्वजण त्यांना गरिबांचा डॉक्टर मामा या नावाने हाक देतात व ओळखतात. या परिसरातील जे लोक शिक्षण घेवून पुणे, मुंबईसारख्या शहरात स्थायिक झालेले आहेत ते आजही वैद्यकीय उपाचारासाठी डॉ. शेख यांचा सल्ला घेतात. त्यांच्या या कार्याची दखल घेवून त्यांना संस्थेने आरोग्यभूषण पुरस्काराने सन्मानीत केले.**

# चिचोंडी पाटील गणात लंके यांच्या प्रचाराचा झंजावात

## सभापती इंजि. प्रविण कोकाटे यांचे नियोजन

नगर : प्रतिनिधी

**लोकसभा निवडणूकीमधील महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ चिचोंडी पाटील गणात नगर पंचायत समितीचे सभापती प्रविणदादा कोकाटे यांच्या पुढाकारातून प्रचार फेऱ्यांचे नियोजन करण्यात आले होते. महाविकास आघाडीच्या एकजुटीमुळे या झंजावाती दौऱ्यास मतदारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. या गणात लंके यांना ८०टक्के मतदान घडवून आणण्याचा निर्धार प्रवीणदादा कोकाटे यांनी केला.**

या प्रचार दौऱ्यामध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, घनश्यामअण्णा शेलार, संपत भाऊ म्हस्के, बाबासाहेब गुंजाळ, शरद पवार हे सहभागी झाले होते. नारायणडोह येथील चांगदेव मंदिरात आ. नीलेश लंके यांच्या हस्ते नारळ वाढवून प्रचारास प्रारंभ करण्यात आला.

या प्रचार दौऱ्यादरम्यान कांद्याचे कोसळलेले भाव, दुधाचे कमी झालेले दर व एकूणच शेतमालास भाव मिळत नसल्याने मतदार वर्गामध्ये कमालीची नाराजी पहावयास मिळाली. महाविकास आघाडीच्या वतीने शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील.



आगमन होताच ढोल ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत करण्यात आले. फटाक्यांची आतिषबाजी तसेच क्रेनच्या मदतीने भव्य हार घालून लंके यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मोठया संख्येने मतदार उपस्थित होते.

सभेसाठी शशिकांत गाडे, घनश्याम शेलार, उध्दव दुसुंगे, बाबासाहेब गुंजाळ, बाळासाहेब हराळ, आबासाहेब कोकाटे, महादेव खडके, डॉ. फिस्के, विठ्ठल कोकाटे, अप्पासाहेब पवार, नानासाहेब

**चिचोंडी पाटील येथील प्रचार सभेत सॉफ्टवेअर इंजिनियर मारुती कोकाटे यांच्या कुटुंबियांकडून नीलेश लंके यांना निवडणूक खर्चासाठी ५१ हजार रुपयांचा धनादेश तर लोणी सय्यदमीर येथील पोकळे युवक मंगल उद्योग समूहाकडून ५ हजार रुपयांची मदत देण्यात आली.**

महाविकास आघाडीचे नेते शरद पवार यांनी यापूर्वी केंद्रात कृषीमंत्री असताना शेतकऱ्यांसाठी ७२ हजार कोटींची कर्जमाफी केल्याची आठवण प्रचारात सहभागी नेतेमंडळींनी करून दिल्यानंतर मतदारांमध्ये पवार यांच्या विषयी आत्मयीता असल्याचेही दिसून आहे.

लंके यांच्या प्रचारार्थ चिचोंडी पाटील येथे प्रचारसभेचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रचारसभेचे नेटके नियोजन सभापती इंजि. प्रविणदादा कोकाटे यांनी केले होते. लंके यांचे

कोकाटे, इंजि. मारूती कोकाटे, संदेश कार्ले, शरद झोडगे, राजेंद्र भगत, विद्याताई गाडेकर, संदीप कर्डीले, बबन कोकाटे, प्रकाश पोटे, राजू कोकाटे, विश्वसागर कोकाटे, गणेश वाडेकर, पोपट निमसे, चंद्रकांत पवार, अमोल काकडे, प्रशांत कांबळे, महादजी कोकाटे, संतोष कोकाटे, भाऊसाहेब वाडेकर, जयसिंग दळवी, रमा काळे यांच्यासह मोठा जनसमुदाय यावेळी उपस्थित होता.

# कोयत्याचा धाक दाखवून साडे अकरा लाखांचा मुद्देमाल लुटला

## सुप्याच्या पवारवाडी जवळील घटना

सुपा : प्रतिनिधी

**नगर - पुणे महामार्गावर सोमवारी पहाटेच्या सुमारास तालुक्यातील सुपा पवारवाडी येथे चार चाकी वाहनातील प्रवाशांना उलट्या कोयत्याने मारहाण करत दुचाकीवरील लुटारुंनी सुमारे साडे अकरा करा लाख रुपयाचा मुद्देमाल लुटला.**

याबाबत श्रीधर दत्तात्रय वर्धे रा, पुणे यांनी सुपा पोलिसांना दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी श्रीधर वर्धे माझे मित्र श्याम चंद्रकांत ननावरे व चालक हनुमंत प्रभु सोनवणे आम्ही आमच्या कामाच्या निमित्ताने रविवारी श्रीरामपुर येथे आलो होतो. रविवारी रात्री उशीरा आम्ही आमचे काम आटोपून श्रीरामपुरहून अहमदनगर मार्गे पुण्याला जात असताना सोमवारी पहाटे दोन ते तीन वाजण्याच्या दरम्यान आमची गाडी मर्चिडीस क्रमांक एम एच-१२ जेयू ९५५९ ही पंक्चर झाल्याने अहमदनगर पुणे महामार्गावरील सुपा पवारवाडी घाटातील हॉटेल हायवे किंग येथे पंक्चर काढण्यासाठी थांबलो. तेथे गाडी पंक्चर काढुन पुण्याकडे जाण्यासाठी गाडीत बसत असतानाच आमच्या गाडीजवळ एक पल्सर मोटारसायकलवर तीन व्यक्ती आल्या व त्यातील एकाने कोयता काढून कोयत्याच्या उलट्या बाजुने पुढे बसलेल्या माझ्या मित्राला हाणमार केली. त्या तिघा लुटारुंनी आम्हाला सर्व बाजुने घेरले. व आम्हा तिघांनाही त्यांनी गाडीतच आडवे केले व कोयत्याच्या मुठीच्या बाजुने मारहाण करत आमच्या जवळील दागिने व पैसे हिसकावुन घेतले.

या लुटारुंनी २० हजार रु किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये पुष्कराज खडा असलेली ६ ग्रॅम वजनाची अंगठी, ८० हजार रुपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये एक कॅरेट वजनाचा हिरा असलेली ६ ग्रॅम वजनाची अंगठी, ५० हजार रुपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली २० ग्रॅम वजनाची चैन ५० हजार रुपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली २० ग्रॅम वजनाची हातातील कडे, ५ लाख रुपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये पुष्कराज खडा असलेली २० ग्रॅम वजनाची अंगठी, ९० रूपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये हिरा असलेली १० ग्रॅम वजनाची आंगठी, २ लाख ५० हजार रुपये किंमतीची एक सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली १०० ग्रॅम वजनाची चैन, ९० हजार रुपये किंमतीची एक पांढऱ्या सोन्याच्या धातुमध्ये बनवलेली त्यामध्ये मोती असलेली १० ग्रॅम वजनाची अंगठी तसेच फिर्यादीचे खिशातील पाकीट त्यामध्ये एस.बी. आय चे क्रेडेट कार्ड, डेबीट कार्ड, विश्वेश्वर बँक २ डेबीट कार्ड, एक्सेस बँकेचे डेबीट कार्ड, शरद सहकारी बँकेचे डेबीट कार्ड, आधार कार्ड, पैन कार्ड, इसकॉन लाईफ मेंबरशिप कार्ड (पैंटरन कार्ड) असे व ३५ हजार रुपये किंमतीच्या ५०० रुपये दराच्या ७० चलनी नोटा असे एकून ११ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून नेला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

लुटीतील तीन इसम हे साधारण अंदाजे २० ते २५ वयोगटाचे असुन त्यांचा बांधा सडपातळ व मध्यम उंचीचे होते व ते स्पष्ट मराठी मध्ये बोलत होते. असेही वर्धे यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सुपा पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलीस करत आहेत.

# पाणी नाही तर... मतदान नाही !

## ■ बहिष्कार टाकण्याचा इशारा ■ म्हसे येथील शेतकरी आक्रमक



निघोज : प्रतिनिधी

**कुकडी नदीच्या टेल भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळावे यासाठी घोड व कुकडी कालवा सल्लागार समिती सदस्य प्रकाश वायसे व घोडगंगाचे तज्ञ संचालक तसेच राज्याचे ज्येष्ठ मंत्री दिलीप वळसे पाटील यांचे ज्येष्ठ समर्थक सोपानराव भाकरे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.७) परिसरातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने कार्यकारी अभियंता प्रशांत कडुसकर यांची भेट घेऊन निवेदन दिले.**

कुकडी डावा कालव्याला १ मार्च ते ८ एप्रिल या दरम्यान ३९ दिवस पाणी सुरू असतानाही ते पाणी कुकडी नदीच्या टेल भागातील म्हसे बुद्रुक व म्हसे खुर्द च्या बंधाऱ्यात आले नाही. पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. कुकडी नदीवरील वरील सर्व बंधाऱ्यांमध्ये पाणी असून टेलचे शेतकरी मात्र पाण्यापासून वंचित राहिले आहेत ,अशा संतप्त प्रक्रिया उमटत आहेत. जर दोन दिवसात पाणी मिळाले नाही तर येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार टाकण्याचा इशारा येथील शेतकऱ्यांनी दिला आहे.

यावेळी रखमा निचित, एकनाथ मुसळे , बाळासाहेब शिंदे , सुभाष शिंदे , बाळासाहेब पवार, हरिभाऊ मुसळे , प्रवीण मुसळे , बिभीषण वराळ , अनिल बढे , सुभाष कोल्हे आदी शेतकरी उपस्थित होते.

### पुढारी व प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

**पारनेर व शिरुर तालुक्यातील म्हसे खुर्द व म्हसे बुद्रुक हे दोन गावांमध्ये कुकडी नदीचे क्षेत्र आहे कुकडी नदीला पाणी आल्याने या दोन्ही गावांचा फायदा होतो मात्र कडक उन्हाळा व पाण्याची टंचाई यामुळे हे दोन्ही गावांतील ग्रामस्थ व शेतकरी हतबल झाले आहेत. पाणी न मिळाल्यास मतदानावर बहिष्कार हा निर्णय झाला असून यासाठी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील पुढारी तसेच आंबेगाव - शिरुर लोकसभा मतदारसंघातील पुढारी काय भूमिका घेतात याकडे जनतेचे लक्ष वेधले आहे. राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या यात्रेसाठी कुकडीला पाणी सोडण्याची मागणी जनतेतून करण्यात आली होती यासाठी सुद्धा पाणी न मिळाल्यास मतदानावर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेऊन पाणी सोडण्याचा निर्णय घेतल्याने यात्रेसाठी पाणी सोडण्यात आले होते. आत्ता म्हसे येथील जनतेने निवडणूकीवर बहिष्कार घालणार असल्याचा इशारा दिला असून पुढारी लक्ष घालतात की जिल्हाधिकारी लक्ष घालतात याकडे लक्ष वेधले आहे.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com